# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः13.06.2024** **वारःगुरुवार**

---

1. महाराष्ट्र आणि जर्मनीतील राज्य बाडेन-वुटेमबर्ग यांच्यादरम्यान कुशल मनुष्यबळासाठी करार

2. विधान परिषदेच्या पदवीधर तसंच शिक्षक मतदार संघाच्या 4 जागांसाठी निवडणूक लढतीचं चित्र स्पष्ट

3. मिफ चित्रपट महोत्सवाचं यंदा मुंबई, पुण्यासह 4 शहरांमध्ये आयोजन आणि

4. वीस षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा अमेरिकेवर सात गडी राखून विजय

**<u>बाडेन-वुटेनबर्ग-</u>**

महाराष्ट्र आणि जर्मनीतील राज्य बाडेन-वुटेमबर्ग यांच्यामध्ये उद्योग क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ पुरवण्याकरिता झालेला करार हा मानव संसाधन विकास क्षेत्रातील मैलाचा दगड ठरणार आहे. या करारामुळे दोन्ही राज्यांच्या आर्थिक विकासाला हातभार लागणार असून भविष्यातील विविध क्षेत्रातील सहकार्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

युरोपीय देशांच्या मागणीप्रमाणे त्यांना कुशल मनुष्यबळ पुरविण्याच्या भूमिकेतून करण्यात आलेल्या या कराराच्या अनुषंगानं सुकाणू समितीची बैठक काल जर्मनीतील स्टुटगार्ड इथं झाली. या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी दूरस्थ पद्धतीने सहभागी झाले, त्यावेळी ते बोलत होते.

स्टुटगार्ड इथल्या या बैठकीत शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्यासह बाडेन-वुटेमबर्गचे मंत्री आदी मान्यवर सहभागी झाले होते.

भारत आणि जर्मनी यांचे अनेक दशकांपासून द्विपक्षीय संबंध आहेत. महाराष्ट्र आणि बाडेन-वुटेमबर्गमधील हा सामंजस्य करार या भक्कम भागिदारीचा पुरावा आहे. या करारामुळं जर्मनीतील मनुष्यबळाची समस्या सुटण्याबरोबरच महाराष्ट्रातील कुशल मनुष्यबळाला आंतरराष्ट्रीय अनुभव मिळण्याची सुवर्णसंधी मिळणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. महाराष्ट्रातील तरुणांसाठी नवीन रोजगार संधी निर्माण करण्यात केलेल्या सहकार्याबद्दल बाडेन-वुटेनबर्ग राज्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी आभार मानले. हा करार इतर देशांसाठी आदर्श ठरेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<u>इस्टोनिया सहकार्य</u>**

पूर्वीच्या सोव्हिएत युनियन मधून स्वतंत्र झालेला इस्टोनिया हा देश सायबर सुरक्षा, ई – गव्हर्नन्स, डेटा सुरक्षा, माहिती तंत्रज्ञान, घनकचरा व्यवस्थापन, मेट्रो व्यवस्थापनात अग्रेसर असून या क्षेत्रात भारताशी आणि विशेषतः महाराष्ट्राशी सहकार्य करार करण्याबाबत उत्सुक असल्याचं इस्टोनियाच्या भारतातील नवनियुक्त राजदूत मार्जे लूप यांनी सांगितलं.

पदभार स्वीकारल्यानंतर प्रथमच मुंबई भेटीवर आलेल्या लूप यांनी राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन इथं काल सदिच्छा भेट घेतली, त्यावेळी त्या बोलत होत्या.

इस्टोनियाच्या टारटू विद्यापीठात १८३७ पासून संस्कृत भाषा शिकवीत असत. या विद्यापीठाला संस्कृत अध्यापक उपलब्ध करून संस्कृत भाषा वर्ग पुन्हा सुरु करण्यास महाराष्ट्रातील संस्कृत विद्यापीठ मदत करेल, असं सांगत इस्टोनियानं विद्यार्थी आणि अध्यापक देवाण-घेवाण वाढवावी अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली.

**पदवीधर शिक्षक निवडणुका**

विधान परिषदेच्या मुंबई पदवीधर तसंच शिक्षक मतदारसंघ, कोकण विभाग पदवीधर आणि नाशिक विभाग शिक्षक मतदारसंघ अशा ४ जागांसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल शेवटचा दिवस होता.

कोकण पदवीधर मतदारसंघात महायुतीचे निरंजन डावखरे आणि महाविकास आघाडीचे रमेश कीर यांच्यात थेट लढत होणार आहे.

नाशिक शिक्षक मतदारसंघात एकंदर १५ उमेदवारांनी माघार घेतली. इथं आता शिवसेनेचे किशोर दराडे, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे संदीप गुळवे आणि अपक्ष उमेदवार विवेक कोल्हे अशी लढत होणार आहे.

मुंबई पदवीधर मतदारसंघात भाजपचे किरण शेलार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांच्यात लढत होईल. तर मुंबई शिक्षक मतदारसंघात भाजपाचे शिवनाथ दराडे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज. मो. अभ्यंकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे शिवाजीराव नलावडे आणि शिक्षक भारतीचे सुभाष मोरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

**कचरा**

पुण्यातील हांडेवाडी इथल्या घनकचरा प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता वाढवुन ७५ मेट्रिक टन केली जाणार आहे. हा प्रकल्प १५ वर्षासाठी देखभाल दुरूस्तीसह चालविण्यासाठी देण्यात येणार आहे. त्यासाठी ५७ कोटी ५९ लाख रूपयांच्या निविदेला स्थायी समितीनं मंजुरी दिली. पुणे शहरात रोज अंदाजे अडीच हजार मेट्रिक टन कचरा निर्माण होतो.

**भांडारकर**

पुण्यातील भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेत यावर्षी ऑगस्टपासून १२ महिने कालावधीचा प्राचीन हस्तलिखितं, ग्रंथसंपदा आणि दुर्मिळ वस्तूंचं संवर्धन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम इंग्रजी माध्यमातून शिकवला जाणार आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधारक यासाठी प्रवेश घेऊ शकतो, वयाचं कोणतंही बंधन नाही. भारतीय वैज्ञानिक वारसा आणि परंपरा, संस्कृती, तत्वज्ञान या विषयांना भारतीय ज्ञान प्रणालीमध्ये असलेलं स्थान लक्षात घेवून या अभ्यासक्रमाची आखणी केली आहे. या विषयांसोबत दुर्मिळ आणि प्राचीन वस्तूंचं संवर्धन करण्याची शास्त्रशुध्द पध्दती यामध्ये शिकवली जाणार आहे.

**मिफ्फ-**

18 वा मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव मुंबईसह अन्य शहरांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. यंदा मुंबईबरोबरच दिल्ली,कोलकाता,चेन्नई आणि पुणे या शहरांमध्ये देखील मिफमधील चित्रपट पाहता येणार आहेत; जगभरातील सर्वोत्कृष्ट माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशन पटांसारख्या कथाबाह्य चित्रपट यात प्रदर्शित केले जातील. मिफ महोत्सव दक्षिण आशियातील सर्वात भव्य आणि सर्वात जुना कथाबाह्य चित्रपट महोत्सव म्हणून ओळखला जातो.

जास्तीतजास्त भारतीय प्रेक्षकांना अधिक दर्जेदार माहितीपट पाहण्याची संधी उपलब्ध करण्याच्या एनएफडीसीच्या बांधिलकीमुळे हे नाविन्यपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. देशभरातील या विविध सांस्कृतिक केंद्रांमध्ये मिफ प्रदर्शित करून, देशभरातील चित्रपट रसिकांद्वारे माहितीपटांना अधिकाधिक दाद मिळावी हा यामागचा उद्देश आहे.

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात विविध शहरांमध्ये प्रदर्शित होणाऱ्या चित्रपटांचं वेळापत्रक PIBच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**<u>कृषी उत्पादन मंडळ</u>**

शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांसाठी पणन विषयक सुविधा निर्माण कराव्यात, अशा सूचना पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिल्या. राज्य कृषी उत्पादन मंडळाच्या १५२ व्या संचालक मंडळाची सभा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. या बैठकीत ते बोलत होते.

**<u>पणन महासंघबैठक</u>**

राज्यात काही ठिकाणी चांगला पाऊस पडला असून शेतकऱ्यांनी पेरणीच्या पूर्वतयारीला सुरुवात केली आहे. त्यामुळे राज्यात बी-बियाणे आणि खतांच्या मागणीत वाढ होत आहे. पणन महासंघासह इतर संस्थांनी आवश्यकतेनुसार आणि प्राप्त उद्दिष्टानुसार आपल्या वाट्याच्या खतसाठ्याची संपूर्ण उचल करावी. तसंच त्यानंतरही आवश्यकता असल्यास कृषी विभागाने पणन महासंघास अतिरिक्त कोटा मंजूर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल एका बैठकीत दिले. पणन महासंघाच्या कृषी, पणन आणि अन्न आणि नागरी पुरवठा विभागाकडील अन्य मागण्यांवर देखील सकारात्मक चर्चा झाली. याबाबतीतही वेगाने निर्णय घेण्याचे निर्देश पवार यांनी यावेळी दिले.

**<u>ब्रेल मशी</u>**

दृष्टिबाधितांसाठीच्या 'नॅब' या संस्थेनं ब्रेल पुस्तक छपाईसाठी खरेदी केलेल्या अत्याधुनिक 'ब्रेलो 300' या मुद्रण यंत्राचं उद्घाटन राज्यपाल रमेश बैस च्या हस्ते संस्थेच्या वरळी इथल्या मुख्यालयात काल करण्यात आल. राज्यपालांनी दिलेल्या स्वेच्छा निधीतून खरेदी केलेल्या या मुद्रण यंत्रामुळं दृष्टिबाधित व्यक्तींसाठी क्रमिक तसंच, धार्मिक पुस्तकं, पत्रिका आणि अवांतर पुस्तकं छापता येणार आहेत.

**<u>वारीसाठी सूक्ष्म नियोजन</u>**

आषाढी वारीसाठी येणाऱ्या वारकऱ्यांना पालखी मार्गावर आणि तळांवर कोणतीही अडचण येऊ नये, आषाढी वारी सर्वोत्तम व्हावी यासाठी प्रशासनाकडून सूक्ष्म नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली. आषाढी यात्रेच्या अनुषंगाने विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास, पंढरपूर इथं पालखीसोहळा प्रमुख आणि प्रशासन यांच्या बैठकीत ते बोलत होते.

**<u>मेजर वसावे अंत्यसंस्कार</u>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या शहादा तालुक्यातील घोडलेपाडा इथले रहिवासी मेजर रमेश वसावे यांच्या पार्थिव देहावर काल अंत्यसंस्कार करण्यात आलं. केंद्रीय राखीव पोलिस दलात कार्यरत मेजर रमेश वसावे बदलीच्या ठिकाणी रुजु होण्यासाठी निघाले असता भिलवाडा इथं झालेल्या अपघातात त्यांना मरण आलं.

**<u>पाऊस नुकसान</u>**

बुलडाणा जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या मोठ्या पावसानं अनेक नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याचा घटना घडल्या तर वादळी वाऱ्यांमुळं अनेक घरांचं नुकसान झालं. चिखली तालुक्यातील देऊळगाव घुबे या गावातील एक लहान मुलीचा वादळी वाऱ्यामुळे मृत्यू झाला.

हिंगोली जिल्ह्यात सिरसम, बासंबा, हिंगोली, माळहिवरा या चार मंडळात अतिवृष्टी झाली आहे. कळमनुरी तालुक्यातील आखाडा बाळापूर नजीकच्या पिंपरी इथं एक शेतकऱ्याचा वीज पडून  मृत्यू झाला.

**पूल पाण्याखाली**

यवतमाळ जिल्ह्यात दारव्हा तालुक्यात अडान नदीला पूर आल्यानं बोरी अरब गावाजवळील पूल पाण्याखाली गेल्यामुळं यवतमाळ ते दारव्हा मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. तीन तासांनी पुराचं पाणी ओसरल्यावर वाहतूक सुरू झाली. शेजारीच बांधकाम सुरु असलेला नवीन पूल गेल्या तीन वर्षांपासून रखडला आहे.  त्यामुळे लोकांचे प्रचंड हाल होत आहेत. तसेच गावातून तालुकास्थानी आणि तालुक्यातून जिल्ह्याच्या ठिकाणी पोहोचणं पुरामुळे अशक्य ठरत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील कासेगाव इथं मुसळधार पावसामुळं ओढ्याला आलेल्या पुरात एक जण बेपत्ता झाला आहे.

टी-**20** विश्वचषक

आयसीसी पुरुष टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत भारतानं काल यजमान अमेरिका संघाला सात गडी राखून पराभूत केलं. न्यूयॉर्क इथं झालेल्या सामन्यात अमेरिकेनं प्रथम 110 धावा केल्या. त्या पार करताना विराट कोहली सौरभ नेत्रावळकरच्या पहिल्याच चेंडूवर बाद झाला, दुसऱ्याच षटकात रोहित शर्मा तीन धावांवर बाद झाला. सूर्यकुमार यादवनं अर्धशतक आणि शिवम दुबेच्या साथीनं भारताला विजय मिळवून दिला. या विजयामुळं अंतिम आठ संघांसाठी भारत पात्र ठरला असून अ गटात भारताला अजून एक सामना खेळायचा आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजा आणि जोराचे वारे यांच्यासह पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.